VOL- VI ISSUE-IX SEPTEMBER 2019 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 5.707 | ISSN 2349-638x

# अस्पृश्यता निवारणासंबंधी राजर्षी शाहू महाराजांची भूमिका

**प्रा. वाणी प्रकाश रेशमाजी**
इतिहास विभाग प्रमुख,
लोकसेवा महाविद्यालय, औरंगाबाद.

भारतात अनेक राजे होवून गेले. परंतु राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रातील केलेले कार्य हे भारताच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहण्यासारखे आहे. त्यांनी त्यांच्या राजपदाचा उपयोग हा समाज उद्धारासाठी केला व एक राजा काय करु शकतो व त्याने काय केले पाहीजे याचा मापदंड घालून दिला. त्यांनी केलेल्या अनेक सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक सुधारणांबरोबर दलित व अस्पृश्यांसाठी केलेले कार्य हे खूपच महत्त्वाचे आहे. राजर्षी शाहू महाराजांना खुप अल्प आयुष्य लाभले केवळ ४८ वर्षाच्या काळात केलेले कार्य हे चिरस्मरणात व मार्गदर्शनपर आहे. त्यापैकी त्यांनी केलेल्या अस्पृश्यता निवारण या संबंधी त्यांनी घेतलेली भुमिका या विषयावर प्रकाश टाकण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. यासाठी त्यांनी अनेक भाषणातुन व वटहुकूम जारी करुण अस्पृश्यता मिटविण्याचे कार्य केले.

अस्पृश्यता हा भारतातील उच्च-निच स्वरुपाच्या जातीव्यवस्थेतून जन्माला आलेला एक महाभयंकर प्रकार आहे. त्याकरिता ही उच्च-नीच जाती-जमातीची उतरंड मोडली पाहिजे अशी भूमिका प्रथम पासूनच शाहू महाराजांची होती. अस्पृश्यता हे जातीव्यवस्थेच्या समाजवृक्षाला लागलेले विषारी फळ आहे. आणि याचे निर्मूलन करायचे असेल तर समाजातील जातीभेद मोडले पाहिजे अशा प्रकारचे धोरण शाहू महाराजांच्या विचार व कृतीतून दिसून येते. महाराजांनी अस्पृश्यांचे प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत मूलगामी विचार मांडले त्या विचारांना आपल्या राज्यात कायद्याचे स्वरुप देवून त्याची काटेकोरपणे स्वतः अंमलबजावणी केली. व राज्यातील सर्व दलित व अस्पृश्यांना आपल्या विचारांचा व कृतीचा आधार देवून संरक्षणही दिले. ते एका भाषणात म्हणतात "हिंदुस्थान शिवाय इतर कोणत्याही देशात मनुष्यात जात नाही परंतु दुर्दैवाने हिंदुस्तानात मात्र जातीभेद इतका तीव्र आहे की, मांजर, कुत्रे किंबहुना शेणापेक्षा देखील कमी, अशाप्रमाणे आम्ही आपल्या देशबांधवास व भगीनीस वागणूक देतो. तोजने, बडबडणारे पूढारी आम्हास नको आहेत. कृतीने जातीभेद मोडून आम्हास, मनुष्याप्रमाणे वागवतील असे पूढारी पाहिजेत."

त्या काळातील काही अहंमन्य मंडळी अवघ्या बहुजन समाजाला अस्पृश्य लेखत असे. महाराजांनी या अहंततेतून एक विचार सुत्र शोधून काढले. अस्पृश्य म्हणजे ब्राह्मणेत्तर असे समीकरण मांडले. आणि आपल्या राज्यातील ५०% शासकीय जागा या वर्गासाठी राखून ठेवल्या. मंडल आयोगापूर्वीचा हा "शाहु आयोग" अधिक क्रांतिकारक स्वरुपाचा होता असे मानावे लागेल.

आपल्या दलित बांधवांना उद्देशून केलेल्या भाषणात ते म्हणाले, तुम्हाला अस्पृश्य मानणाऱ्या पूष्कळ लोकांपेक्षा तुम्ही जास्त बुद्धिमान, पराक्रमी, सुविचारी, स्वार्थत्यागी व या हिंदी राष्ट्राचे अवयव घटक आहात. आपण बरोबरीची भावंडे आहोत आपले हक्क समसमान आहेत. महाराज त्यांच्याबरोबर स्वतः सहभोजन घेत असे धनंजय किर लिहतात- खरोखर बुद्धानंतर भारतात राजर्षी शाहू हाच राजा होवून गेला की जो हरिजन व गिरीजन यांच्या पंक्तीस प्रेमाने, निर्भयपणे व उघडपणे जेवला. "महाराजांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र्य शाळा काढल्या व नंतर शिवाशिव, परवानगी नसल्यामुळेहि सर्व जातीचा व धर्माच्या मूलांना एकत्र बसविण्यात आले. त्यामुळे त्यांच्यातील न्यूनगंड कमी झाला. शाहू महाराजांचे हृदय हे जनतेचे हृदय होते. जनतेच्या सामान्य जिवनाचे ते पूरस्कर्ते होते. लोकनायक, लोकसंग्राहक, लोकसेवक, दीनबंधू, विद्येचा प्रसारक, धर्माचा सुधारक अशा प्रकारची अनेक बिरुदे त्यांना अपूरी पडतात

राजर्षी शाहू महाराज आपल्या एका भाषणात म्हणतात अस्पृश्यतेमुळे पददलीत माणूस गुलामगिरीचे जिवन जगत आहे. व सामाजिक दृष्ट्या हीन समजला जात आहे. आर्थिक दृष्ट्या त्याला सवर्ण वरिष्ठांचा सेवक, चाकर बनविला गेला, राजकीय दृष्ट्या तो गुलाम बनविला गेला. नागपूरच्या भाषणात ते बोलतात आज याठिकाणी आपणापैकी कितीतरी अस्पृश्यांचे पूढारी आहात. आपण इतरांपेक्षा कोठेही कमी नाही. अस्पृश्यता निवारणासाठी महाराजांनी रोटीव्यवहाराबरोबर बेटी व्यवहाराचा विचार मांडला होता. व असे विचार मांडणारा हा पहिला राजा होता. आजच्या "एक गाव एक पाणवठा" हा अस्पृश्यता निवारणाचा कार्यक्रम शाहू महाराजांनी ९० वर्षांपूर्वीच केला होता.

नासीक येथील १६ एप्रिल १९२० च्या भाषणात आपण केलेल्या कार्माबद्दल सांगतात. ऑफिसमध्ये एकही मागसर्वीय माणूस दिसत नव्हता. परतु आज चित्र बदलले आहे. आणि माझ्या पंचवीस वर्षाच्या कामाला फळ आल्याचे आशादायक चित्र निर्माण झाले आहे. महाराजांनी काही वटहूकूमही काढले. शाळाखात्यात अस्पृश्यांच्या मूलांना माणूसकी व न्याय मिळवून देणारा होता. ते म्हणतात आमच्या लक्षात आलेला आहे की, अस्पृश्यांना झालेल्या कंपाउंडच्या आत

येवू दिले जात नाही. सरकारी इमारती खाजगी उपयोगासाठी दिलेल्या नसल्यामूळे अस्पृश्यांना तृच्छतने वागविण्याच कूणालाही हक्क नाही. अस्पृश्यांची प्रत्येक तऱ्हने काळजी घेतली पाहिजे. शिक्षणसंस्था गरिबा लोकासाठी असून गरिब व अस्पृश्यांना समानतेने वागवले पाहिजे. शाळांना ग्रॅड देत असल्यामूळे प्रिन्सीपल अथवा शिक्षकाने हे सुत्र पाळले नाही तर शाळेचे अनूदान बंद करण्यात येईल.

सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळू नये यासाठी शाहु महाराजांनी वट हूकूम काढला होता. सर्व सार्वजनिक इमारती, धर्मशाळा रेस्ट हाऊस, सरकारी, अन्नदाने जरी, पाणवठे, सार्वजनिक विहीरी. येथे कोणत्याही मनुष्य प्राण्याचा विटाळ मानावयाचा नाही. ख्रिश्चन पब्लीक, बिल्डींगमध्ये व सार्वजनिक विहीरीवर जरी अमेरिकन मिशनमधील डॉ.व्हेल व वानासेस हे सर्वांना एकसमान ममतेने वागवीतात त्या प्रमाणे येथेही कोणाचा विटाळ न मानता वागवले पाहिजेत. तसे न झाल्यास गाव कामगार, पाटील, तलाठी, यांना जोखीमदार धरले जाईल. तसेच १९ जाने १९९९ रोजी खात्यासाठी अपृश्यतेच्या कारणावरुन भेदाभेद करु नये म्हणून एक वर हूकूम काढला होता. मेडिकल खात्यात हल्ली नोकर असलेल्या व पूढे नोकर होणाऱ्या प्रत्येक इसमाला या हूकूमाची नक्कल देण्यात यावी व ऑफिसमध्येही नक्कल टांगून ठेवण्यात यावी, अशाच प्रकारचे हूकूम शाहू महाराजांनी रेव्हन्यु व न्याय खात्याच्या संबंधीही काढले होते. "आमच्या राज्यात कोणत्याही इसमाला जनावराप्रमाणे न वागवीता मनुष्याप्रमाणे वागवावे शाहु महाराजांनी जे वर हूकूम १९१९-२० च्या काळात काढले तश्याच स्वरुपाचे अस्पृश्य विचारणासंबंधीचे कायदेभारतातील मुंबई, मद्रास, मध्यप्रदेश, बिहार, पंजाब, ओरिसा, उत्तर प्रदेश, बंगाल, मध्य भारतात पहिल्या कॉंग्रेस सरकारने आदेश स्वातंत्र्योत्तर काळात काढले होते. त्यामानाने शाहू महाराज काळाच्या किती पूढे होते हे लक्षात येते. शाहू महाराजांच्या वटहुकुमानंतर मुंबई प्रांतात १९५० मध्ये राज्यघटनेच्या १७ व्या आर्टिकलने अस्पृश्यता नष्ट केली. १९५५ साली केंद्रिय सरकारने एक भारतव्यापी असा अस्पृश्यता नष्ट करणारा कायदा पास केला आणि अस्पृश्यता पाळणाऱ्यास व उत्तेजन देणाऱ्यास दंड व शिक्षा ठरवलेली आहे. शाहू महाराजांनी केलेल्या मूळ पायाच प्रांतीय व केंद्रिय सरकारने कायद्याने मान्य केला. हे शाहू महाराजांच्या भारतीय समाजातील अस्पृश्यता संबंधीचे महत्त्वाचे निर्णय होते. व ते किती पूरोगामी विचाराचे होते हे याठिकाणी आवर्जून मांडावे लागेल. ज्यावेळी शाहू महाराज राजगादीवर आले त्यावेळी प्रशासन विभागात ७१ पैकी ६० जण ब्राह्मण होते. खाजगी कार्यालयात ५३ पैकी ४६ ब्राह्मण होते. ९०% बहुजन समाजाचे प्रतिनिधीत्व कार्यालयात, कचेरीत, सार्वजनिक संस्थात कोठेच घडत नव्हते. महाराजांनी प्रयत्नपूर्वक हे चित्र बदलून टाकले. राखीव जागा ठेवून अनाथांना कडेवर घेतल्याने प्रस्थापितांनी मोठा कांगावा केला. परंतु महाराज निर्णयावर ठाम राहील्याने छत्रपतींचा विकासाचा रथ राजवाड्याकडून महारवाड्याकडे वळला. अनेक पूरोहितांनी यास धर्म व संस्कृती बूडाली असा कांगाव केला परंतु महाराज हे हिमालयाप्रमाणे अभेद्य होते. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी केवळ वटहूकूम किंवा सरकारी आदेश काढून हे अस्पृश्यता निवारणाचे कार्य न करता आपल्या वैयक्तीक व खाजगी आयूष्यात ही अस्पश्यांना सन्मानाची वागणूक दिली. त्यांना आपल्या घोड्याच्या उघड्या खडखळयात घेवून गावात फिरु लागले. आपल्या मिरवणूकीत हत्तीचा माहूत हा अस्पृश्य ठेवला. व त्याला सोन्याच्य अंबारिपूढे बसविला. अस्पृश्यांना राणीसाहेब, अक्कासाहेब व युवराजांच्या मोटारीवर ड्रायव्हर नेमले. आपल्या पंक्तीत महार-मांग, चांभार यांना बसवू लागले. काहींना दरबारात सरदारकी, अंगरखा, तलवार पट्टा व जरिचा फेटा देऊन माणकऱ्यांना रांगेत नेऊन बसवले. पट्टेदार शिपाई, स्वतःचे अंगरक्षक अस्पृश्यांना नेमले. थोडेसे शिक्षण झालेल्यांना त्या मानाने कारकून रजिस्टार जागाही देऊ केल्या. आणी तत्कालीन व आताच्या पुढारी राजकारणी समाजकारणी व नेत्यासमारे एक आदर्श ठेवला आहे. एक संस्थानिक राजा 'जनहिताची कोणकोणते कामे करु शकतो. याचां महान आदर्श शाहू महाराजांनी निर्माण केला.

१९२० च्या माणसाच्या परिषदेत शाहु महाराजांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची परिषदेस आलेल्या असंख्य दलित अस्पृश्य जनसमूदयास 'हाच तूमचा भावी नेता' अश्या शब्दात ओळख करुन दिली शाहू महाराजांची ही भविष्यवाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी खरी ठरवली.

महाराजांचे व्यक्तीमत्व हे लोकोत्तर होते ते रसीक, कलाप्रेमी, कुस्तीगीर होते. शिवाजी महाराजांनंतर भोसले कुळाच्या किर्तीत शाहू महाराजांनी कळस चढविला. त्यांची कामगीरी व दृष्टी सार्वजनिक हिताची होती. त्यांच्याठायी सर्वाचा संबंधांचे अद्वैत कळवळा दया लोकोपकार हे गूण होते. ते व्यक्ती नव्हे तर एक विचार संस्था होते. व्यक्ती, नेते, व मुत्सद्धी या तिन्हीही दृष्टीने त्याचे चरित्र अधिक अधिक अभ्यासनीय आहे. आगरकर म.फुले. यांच्या निधनानंतर सामाजिक समतेची मशाल पेटविण्याचे काम राजर्षी शाहु महाराजांनी केले व छत्रपती ही पदवी सार्थ केली. महाराजांच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कर्तुत्वाची नोद केब्रीज विद्यापीठाने घेतली व त्यांना एल.एल.डी ही सन्माननीय पदवी बहाल केली. आणि ज्ञानाच्या क्षेत्रात त्यांच्या बहुमान घडला. अशाप्रकारे, छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी इतर अनेक कार्याबरोबर सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी "अस्पृश्यता" मिटविण्याचे कार्य निर्धाराने केले व आज आपण त्यांच्या या कार्याचे फळ चाखत आहोत. आणि ऋणी आहोत.

**संदर्भ :**

१. सामाजिक चळवळींचा इतिहास - शंकरराव खरात
२. विचार दर्शन - य. ना. चव्हाण, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

३. राजर्षी शाहू महाराज - डॉ. जयसिंगराव पवार
४. दिपस्तंभ - प्राचार्य शिवाजीराव भोसले
५. राजर्षी शाहू महाराजांची निवडक भाषणे आणि आज्ञापत्रे - संपा. प्रदिप गायकवाड.
६. आधूनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास - प्रा. दिनेश मोरे
७. आधूनिक भारताचा इतिहास - प्रा. डॉ. श्रीनिवास सातभाई.
८. www.rajarshi shahumaharaj.com